कनिष्ठ अभियंता-स्थापत्य (गट-क)
या संवर्गात तात्पुरत्या व स्थानापन्न
स्वरुपात पदोन्नत्या/नेमणूका

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१
आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१९/२९००/प्र.८
दिनांक : 30 OCT 2019

आ दे श

प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **स्थापत्य अभियांत्रिकी सहायक (गट-क)** संवर्गात कार्यरत असलेल्या निम्न कर्मचाऱ्यास खालील अटी व शर्तींना अधीन राहून **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (गट-क)** या संवर्गात वेतन बँड रुपये ९३००-३४८०० या वेतन बँड मधील ग्रेड वेतन रूपये ४३००/- या सुधारीत वेतन संरचनेत एतदर्थ, तात्पुरत्या आणि स्थानापन्न स्वरुपात पदोन्नत्या देण्यांत येत आहे. पदोन्नती नंतर त्यांची पदस्थापना खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सध्याचे कार्यालय | पदोन्नती नंतरचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. ए.के.पाठक | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक / प्राधिकरण | कनिष्ठ अभियंता / मुंबई मंडळ | रिक्त पदी |

२/- उक्त कर्मचाऱ्यास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय मूळ वेतनाबरोबर महागाई भत्ता व इतर भत्ते नियमानुसार देय राहतील.

३/- सदरहू, कर्मचा-यांच्या तात्पुरत्या पदोन्नतीने केलेल्या नेमणूका, प्रशासकीय सेवा संवर्गाच्या प्रारुप सेवाप्रवेश नियमांच्या अधीन राहून त्यांना पदोन्नतीच्या व अन्य संवर्गात ज्येष्ठतेनुसार तसेच त्यांची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या एतदर्थ व स्थानापन्न स्वरुपाची असल्याने त्यांच्या या संवर्गातील कायम पदांवर कोणताही हक्क/धारणाधिकार राहाणार नाही, या अटीवर करण्यांत येत आहे.

४/- प्रशासकीय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

५/- उक्त कर्मचाऱ्यांनी वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन १०१८/सीआर-११००/एफ/सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतननिश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ [१-अ ] मधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

[कृ.मा.प.]

६/- सदरहू पदोन्नती म्हाडा कर्मचारी संघ यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र.७९२४/२०१३ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

७/- हे आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत संबंधित पदधारकाने पदोन्नतीच्या नेमणूकीच्या ठिकाणी कामावर रूजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

८/- उक्त आदेशानुसार पदोन्नत पदधारक पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रूजू होणार नाहीत त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यांत येईल. तसेच याबाबत शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि. १२.०९.२०१६ मधील तरतुदीनुसार त्यांची पदोन्नती रदद करण्यात येईल व पदोन्नतीसाठी पुढील २ वर्षे त्यांचे नावांचा विचार करण्यात येणार नाही. तिस-या वर्षी त्यांचे नांव विभागीय पदोन्नती समितीसमक्ष सादर करण्यात येईल.

९/- संबंधित मुख्य अधिकाऱ्यांनी / विभाग प्रमुख यांनी पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांचे निश्चित पदस्थापनेचे स्वतंत्र आदेश काढावेत व त्याची प्रत प्राधिकरणाकडे पाठवून द्यावी.

१०/- शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे पदोन्नती कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे सेवा ज्येष्ठतेने मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत. तसे करताना निम्न संवर्गातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीपुर्वी ते दि. २५.०५.२००४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळवून सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत याची खात्री करुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पुर्तता होत नसल्याचे आढळून आल्यास पदोन्नती आदेश रदद करण्यात येतील.

११/- उपरोक्त कर्मचाऱ्यांची दिनांक ३१/०३/२०१९ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरून दिल्याची खात्री करून घेतल्याखेरीज संबंधित कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. तसेच, आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर कर्मचाऱ्यांनी मत्ता व दायित्व सादर केल्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करावा.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**प्राधिकरण यांचे मान्यतेने.**

(प्रसाद उकर्डे)
सचिव/प्राधिकरण

**प्रति,**
श्री. ए.के.पाठक, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक [गट-क]
(विभागप्रमुखां मार्फत)

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित :</u>**

१. मुख्य अभियंता / प्रा. (१/२/३)
२. मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ/ मुं इ दु व पु मंडळ
३. मुख्य अधिकारी/ मुं.झो.सु.मं./कोंकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर मंडळ
४. वित्त नियंत्रंक /प्रा
५. मुख्य लेखाधिकारी /मुंबई मंडळ
६. लेखाधिकारी /प्रा

प्रत प्रशासकीय अधिकारी/प्रा./मुंबई पु मंडळ

**<u>प्रत माहितीसाठी :-</u>**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रत, प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
प्रत, अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असो.ऑफ म्हाडा, मुंबई
प्रत, अध्यक्ष, म्हाडा लिपीक संवर्ग अधिकारी व कर्मचारी संघ

प्रत :- प्रशासन-६/७/९/१०/१२/१३/१४/१५/प्रा.

---***---